जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - ७९३ दिनांक - २३/११/२०२१**

**लोणीकंद पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**शिक्रापुर येथील दरोडा टाकुन खुन करणा-या आरोपीस केले अटक**

दि. ०१/०५/२०२१ रोजी शिक्रापुर पोलीस ठाणे हद्दीतील जमदाडे मळा पिंपळवाडी रोड पाबळ ता. शिरुर जि. पुणे येथील तुळसाबाई पर्वती जाधव यांचे राहते घरी रात्रौच्या सुमारास दरोडा घालुन तुळसाबाई यांची मुलगी शंकुतला प्रकाश शिंदे हीचा खुन केलेला सराईत आरोपी नामे दिनेश कुंदन पवार, वय २५ वर्षे, रा. गणपती माळ तळेगाव ढमढेरे ता. शिरुर जि. पुणे यास अटक करुन गुन्हा उघडकीस आणण्याची मोलाची कामगिरी लोणीकंद तपास पथकाने केली आहे.

लोणीकंद पोलीस स्टेशन हद्दीत वाढत्या डी.पी. चोरीच्या अनुषंगाने तपास करीत असताना पोलीस हवालदार बाळासाहेब सकाटे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, पेरणे डोंगरगाव रोडवर दोन इसम डी.पी.च्या आजुबाजुस संशयीत रित्या फिरत आहेत, सदर बातमी बाळासाहेब सकाटे यांनी सहा. पोलीस निरीक्षक निखील पवार यांना कळविली असता, तपास पथकातील पोलीस अंमलदार कैलास साळुंके, विनायक साळवे, अजित फरांदे, पांडुरंग माने असे सदर ठिकाणी जावुन संशयीत इसम नामे शिवा नाना जगताप, वय ४० वर्षे, रा. केडगाव मार्केटच्या पाठीमागे ता. दौंड जि. पुणे याने व त्याचा साथीदार दिनेश कुंदन पवार यांना ताब्यात घेवुन लोणीकंद पोलीस स्टेशन पुणे येथे आणले, सदर इसमांना गुन्ह्यात अटक करुन पोलीस कोठडी दरम्यान त्यांना विश्वासात घेवुन त्यांचेकडे डी.पी. चोरी गुन्ह्यांच्या अनुषंगाने तपास करता त्यांनी लोणीकंद पोलीस स्टेशन परिसरातील ०५ डी.पी. चोरी केल्याची कबुली दिली असुन त्यांचेकडुन १,८७,०००/- रु. कि.चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच सदर चोरीचा माल स्विकारणारा इसम नामे विरम दिपाराम चौधरी, वय ५० वर्षे, रा. ग्रीलवुड सोसा. शिक्रापुर तळेगाव रोड शिक्रापुर ता. शिरुर जि. पुणे यांस अटक करण्यात आली आहे. आरोपी नामे दिनेश पवार याचेकडे डी.पी.चोरीच्या अनुषंगाने सखोल व कौशल्यपुर्ण तपास करीत असताना त्याने व त्याचे इतर ०४ साथीदार यांचेसह दि. ०१/०५/२०२१ रोजी जमदाडे मळा पाबळ येथे दरोडा टाकुन एका मुलीचा खुन केल्याची कबुली दिली आहे.

सदरची कामगिरी पोलीस आयुक्त श्री. अमिताभ गुप्ता, पोलीस सह आयुक्त पुणे शहर डॉ. रविंद्र शिसवे, अप्पर पोलीस आयुक्त श्री. नामदेव चव्हाण, यांचे अधिपत्याखाली, पोलीस उप आयुक्त श्री. रोहीदास पवार,सहा. पोलीस आयुक्त श्री. किशोर जाधव, यांचे मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. गजानन पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राजेश तटकरे, सहा. पोलीस निरीक्षक निखील पवार, पोलीस उपनिरीक्षक सुरज गोरे, सहा.पोलीस फौजदार मोहन वाळके, पोलीस अंमलदार बाळासाहेब सकाटे, विनायक साळवे, कैलास साळुंके, अजित फरांदे, समिर पिलाणे, बाळासाहेब तनपुरे, पांडुरंग माने, सागर शेंडगे यांनी केली आहे.

